2295

जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ याचे
कार्यालय. दिनांक:- 0 AUG 1990 /१९९०.

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक विभाग.]
जिल्हा परिषद, पुणे ११.

विषय:- सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथ. शाळांना परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलएस १०९०/प्राशि ३/५२०५ दिनांक. ११ जुलै ९० चे पत्र.

उपरोक्त विषया संबधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केले शासनाकडील संदर्भाधीन पत्र कृपया अवलोकन करावे.

या बाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्या बाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदी ला अपवाद करुन खाली नमुद केलेल्या संस्थेला तीच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातुन जून १९९० पासून इयत्ता १ ली ते सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षात प्रत्येक्ष सुरु असलेल्या वर्गासह ची प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटीची पूर्तता करण्याचा शर्ती वर विनाअनुदान तत्वार "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भाविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचेनांव | शाळेचे नावं व ठिकाण | इयत्ता. | माध्यम. |
|---|---|---|---|
| १. महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग ॲंड एज्युकेशन रिसर्च, कोथरुड, पुणे | कोथरुड, पुणे | इ. १ली ते १९९०-९१ या शैक्ष. वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह | मराठी |
| | — " — | — " — | इंग्रजी |
| २. — " — | | | |

१. संस्था सदर शाळा विनाअनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहीजे.

२. संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहित केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधाचे सोय केली पाहीजे तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दरानेच वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

31/8/98

Shri Birari
Sig/..
31/8

[पान २ वर]

सौ. नीलम वाघ
मुख्याध्यापिका
श्री शारदा प्राथमिक विद्यालय
(मराठी माध्यम)
१२७/१ अ, पौड रोड, पुणे-३८.

३. संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाची उदा. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
४. संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणातेही दुष्परीणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

५. ही परवानगी देण्यापूर्वी संस्थे बाबत खाली नमुद केलेल्या बाबींची खात्री करून घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्या बाबत कार्यवाही करण्यात यावी.

१. संबधीत संस्था, संस्था नोंदणी अधीनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणी कृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेचे मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबधीत संस्थेत कोणात्याही प्रकारच्या गैर व्यवहार चालत असल्याबाबत या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा.]
७. शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालु ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी या बाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

शेखा/-

प्रत:- प्रशासन अधिकारी, म. न. पा. शिक्षण मंडळ, पुणे ५.
~~प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण~~ मंडळ ____________

जिल्हा ------------ यांना माहिती व पुढील कार्यवाही साठी.

प्रत:- मा. सचिव महाराष्ट्र अॅकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग अँड एज्युकेशन रिसर्च
कोथरूड पुणे
यांना माहितीसाठी अग्रेषित.

सौ. नीलम वाघ.
मुख्याध्यापिका
श्री शारदा प्राथमिक विद्यालय
(मराठी माध्यम)
१२७/१ अ, पौड रोड, पुणे-३८.